आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।


महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र

School Leadership Academy

Maharashtra


मोड्यूल क्र.११

# मुंबई शहराच्या रेड लाईट क्षेत्रातील मातांच्या अपत्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

# The Role of School Leadership in Children of Mothers in the Red Light Area of Mumbai into the Mainstream of Education



**<u>प्रस्तावना-</u>**

शिक्षण म्हणजे 'ज्ञान, कौशल्ये व अभिवृद्धी यांचे संपादन.' जॉन डयुई यांच्या मते शिक्षण म्हणजे 'लहान व असहाय मनुष्यप्राण्याला सुखी, नीतिमान व कार्यक्षम बनविण्यास मदत करणे.' शिक्षण हे फक्त भावी जीवनाची तयारी एवढ्या पुरतेच मर्यादित नसून मुलांचे प्रत्यक्ष जीवनच असते. असे हे शिक्षण दिव्यांग मुले, ग्रामीण भागातील मुले, झोपडपट्टी म्हणजे आर्थिक दृष्ट्या मागासलेला वर्ग, वंचित गट, रेड लाईट क्षेत्र या भागांपर्यत पोहोचविताना अडचणी निर्माण होतात. मात्र शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे, ज्याद्वारे समाजाला समानता, समावेशकता आणि सामाजिक व आर्थिक गतिशीलता मिळू शकते.

समता हे भारतीय राज्य घटनेतील एक महत्त्वाचे तत्त्व आहे हे आपण जाणतो. शिक्षण आणि समानता यांचे नाते घनिष्ठ आहे. जोपर्यत आपण समतेचे मूल्य अंगीकारत नाही, तोपर्यत शिक्षण हे सर्वसमावेशक होऊ शकत नाही. मग याला रेड लाईट क्षेत्रातील महिलांची मुलेही कशी अपवाद ठरतील? समाजातल्या सर्व स्तरांतील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे ही काळाची गरज आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात सर्व क्षेत्रांतील व समाजाच्या सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. यासाठी ऐतिहासिक दृष्टीने उपेक्षित, वंचित आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. असे नमूद केले आहे.

RTE 2009 नुसार प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. याला रेड लाईट क्षेत्रही अपवाद नाही. या क्षेत्रातील मातांच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे. शिक्षणाने त्यांना सामाजिक व आर्थिक दर्जा प्राप्त करून देणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास करणे ही शालेय नेतृत्वाची मुख्य भूमिका आहे. तसेच ती त्याची जबाबदारीही आहे.

भारताच्या पश्चिम किना-यावर वसलेली महाराष्ट्राची राजधानी म्हणजे मुंबई. भारताची आर्थिक, मनोरंजनाची राजधानी असलेली, फॅशन, चित्रपटसृष्टीची चमक-धमक, टोलेजंग इमारती ते अगदी फुटपाथवर थाटलेले संसार, जगाला नवल वाटेल अशी सर्वात मोठी झोपडपट्टी असलेले आणि सर्वांना सामावून घेणारे एक शहर म्हणजे आमची मुंबई. तीन करोडच्या आसपास लोकसंख्या असणा-या या शहराचा एक भाग म्हणजे कामाठीपुरा हे रेड लाईट क्षेत्र.

रेड लाईट क्षेत्रात वेश्या व्यवसाय करणा-या स्त्रिया येतात. मुळातच त्यांना बऱ्याचदा बळजबरीने फसवून किंवा आर्थिक परिस्थितीमुळे या क्षेत्रात काम करण्यास भाग पाडलेले असते. या महिलांच्या मुलांना समाजात मान सन्मान मिळत नाहीच, तर त्यांना झिडकारलेच जाते. सभोवतालची परिस्थितीही मानसिक खच्चीकरण करणारीच असते.

अशा परिस्थितीतील या मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासन व स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. या मुलांना आसरा देणा-या विविध स्वयंसेवी संस्था आहेत. दीड वर्षे ते पंचवीस वर्षे अशा वयोगटातील मुले या संस्थांमध्ये राहतात. या मुलांना जवळच्या सरकारी किंवा खाजगी शाळांमध्ये दाखल केले जाते. यानंतर या मुलांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी तसेच त्यांना समाजात ताठ मानेने उभे राहता यावे यासाठी शालेय नेतृत्व फार मोलाची भूमिका बजावते.



**कामाठीपुरा परिसर**

रेड लाईट क्षेत्रात अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी प्रेरणा या स्वयंसेवी संस्थेमध्ये आसरा घेऊन शिक्षण घेत असलेल्या मुलांची माहिती खालीलप्रमाणे–

**स्तरनिहाय सन २०२०-२१ मधील मुलांची संख्या-**

| अ. क्र. | भाग | शाळेचा प्रकार | इ.१ ते ५ वी | इ.६ ते ८ वी | इ.९ ते १० वी | इ.११ ते १२ वी | पदवी व पदव्युत्तर शिक्षण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | कामाठीपुरा | मनपा | ३९ | १७ | ४ | ---- | ----- | ६० |
| | | खाजगी | १३ | १६ | १३ | २ | २ | ४६ |
| २) | खेतवाडी | मनपा | ४५ | १४ | ० | ---- | ----- | ५९ |
| | | खाजगी | ८ | १२ | ६ | ६ | ६ | ३८ |
| | **एकूण** | | **१०५** | **५९** | **२३** | **८** | **८** | **२०३** |

**(स्त्रोत– प्रेरणा स्वयंसेवी संस्था)**

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे-**

१) रेड लाईट क्षेत्र ही संकल्पना समजून घेणे.

२) रेड लाईट क्षेत्रातील मातांच्या अपत्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणताना येणाऱ्या आव्हानांवर यशस्वीपणे मात केलेल्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास करणे.

३) रेड लाईट क्षेत्रातील मातांच्या अपत्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

## रेड लाईट क्षेत्र संकल्पना

रेड लाईट डिस्ट्रीक्ट वा प्लेजर डिस्ट्रीक्ट हा शब्द पाश्चिमात्य देशातून आला आहे. वेश्यावृत्ती वा सेक्स संबंधित व्यवसाय असा याचा मोघम अर्थ अपेक्षित आहे. रेड लाईट ही संज्ञा अस्तित्वात येण्याचं कारण म्हणजे त्या काळात कुंटणखान्यांवर टांगलेले लाल दिवे, जेणेकरून तिथे काय चालते याचा अंदाज लोकांना यावा. 'वुमन्स ख्रिश्चन टेम्परन्स युनियन' च्या १८८२ सालच्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये ही संज्ञा लेखी स्वरूपात सर्वात आधी आढळली, तर ऑक्सफर्ड डिक्शनरीनुसार याचे पहिले अवतरण १८९४ मध्ये प्रकाशित झालेल्या ओदिओ प्रांतातील Sandusky शहरातल्या 'Sandusky Register' नामक वृत्तपत्रात आहे. लेखक Paul Wellman सुचवितात की, हा उल्लेख आणि अमेरिकन ओल्ड वेस्टशी संबंधित याच अर्थाचे अन्य उल्लेख कन्सास प्रांतातील डॉज शहरातील संदर्भाशी संलग्न आहे. १९ व्या शतकात इथे रेड लाईट हाऊस सलून्स होती, पण याची खातरजमा अदयापही झालेली नाही. प्रारंभीच्या काळातील रेल्वे लाईनवर काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षिततेचे साधन म्हणून लाल प्रकाशाचे कंदील दिलेले असत. मुक्कामाच्या वेळी ते या सलून्समध्ये जात आणि आपल्या क्रुमधील अन्य सदस्यांना आपण कुठे आहोत हे लक्षात यावं म्हणून ते त्या सलून्सवर कंदील टांगून ठेवत. त्यांच्या सहकाऱ्यांना कळावं म्हणून त्यांनी ही युक्ती वापरली, पण कालांतराने सर्वच लोक या लाल दिव्यांच्या घरांना वेश्या वृत्ती चालणारी घरे म्हणून ओळखू लागली आणि तेथूनच 'रेड लाईट एरिया' हा शब्द अस्तित्वात आला.

चरितार्थासाठी तसेच अधिक धनाच्या वा मौल्यवान वस्तूंच्या मोबदल्यात प्रस्थापित झालेले दोन परक्या व्यक्तींमधील लैंगिक संबंध म्हणजे वेश्यावृत्ती वा वेश्याव्यवसाय असे स्थूलमानाने म्हणता येईल. पैशाच्या आमिषाने, कमी अधिक प्रमाणात अनिर्बंधित स्वैर स्वरूपाची कायमची अथवा तात्पुरती लैंगिक संबंध पध्दत म्हणजे वेश्या व्यवसाय होय. भारतीय समाजात वेश्या व्यवसाय फार प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे उल्लेख प्राचीन ग्रंथात आढळतात. भारतात ब्रिटीश अंमल सुरू झाल्यानंतर या व्यवसायाला वेगळे स्वरूप प्राप्त झाले, उदा. कोलकाता व मुंबई येथील युरोपीय व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी आणि ब्रिटीश सैन्याच्या शारीरिक सुखासाठी कुंटणखाने निर्माण झाले.

आशिया खंडातील सर्वात मोठी वेश्यावस्ती / रेड लाईट एरिया कोलकात्यातील सोनागाची या भागात आहे. कोलकाता–सोनागाची, मुंबई – कामाठीपुरा, दिल्ली – जी. बी. रोड, मध्यप्रदेश मधील ग्वाल्हेर येथील रेशमपुरा आणि उत्तरप्रदेशच्या मेरठमधील कबाडी बाजार हे देशातील पाच सर्वात मोठे रेड लाईट एरिया आहेत. याखेरीज पुण्यातील बुधवार पेठ, वाराणसीमधील दालमंडी, उत्तरप्रदेशच्या सहारनपूर मधील नक्कास बाजार, बिहारच्या मुजफ्फरपूर मधील रेड लाईट क्षेत्र आणि नागपूरमधील गंगा जमुना हे भाग देखील कुख्यात आहेत. यांपैकी कामाठीपुरा हा इंग्रजांनी वसवला होता. अर्थात या माहितीतही एकमत नाही. १७९५ मध्ये येथे आन्ध्रप्रदेशातून आलेल्या कामाठी महिलांनी देहविक्रीस प्रारंभ केला होता असेही सांगितले जाते, तर अन्य माहितीनुसार १८८० मध्ये ब्रिटिशांनी अधिकृतरीत्या येथे १४ लेनमधून कामाठी वेश्यांना वसवले आणि ब्रिटीश सैनिकांच्या देहभुकेची तजवीज केली. यामुळेच या भागाचे नाव कामाठीपुरा पडले असेही सांगितले जाते. देशातील दुसऱ्या नंबरचा चमडी बाजार असलेला मुंबईतला रेड लाईट एरिया १.५ लाख वेश्यांच्या संख्येवर जाऊन पोहोचला आहे. (संदर्भ- Facts And Figures About Prostitution) सन १९९२ मध्ये बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनने (BMC) येथे वेश्यांची संख्या ४५,००० असल्याची नोंद केली होती, ती २००९ मध्ये घटून १,६०० वर आली आहे.




अशा क्षेत्रातील मातांच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे जिकिरीचे काम आहे. कारण त्या मातांना शिक्षणाशी काही देणे घेणे नसते. तसेच त्यांना स्वातंत्र्यही नसते. 'घरवाली' वा 'आदमी' यांची त्यांच्यावर सतत नजर असते. त्यांची मुलेही त्याच वातावरणातून येतात. त्यामुळे त्या वातावरणाचा / परिसराचा त्यांच्यावर परिणाम झालेला असतो. मारामारी, अपशब्दांचा वापर करणे हे नित्याचेच असते, पण अशा क्षेत्रातील मुलांसाठीही शालेय नेतृत्व, धडपडत त्या मुलांना शिक्षण देणे हे आपले कर्तव्य आहे, ही जाणीव ठेवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून, गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे.

या मोड्यूल मध्ये रेड लाईट भागातील मातांच्या अपत्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात शालेय नेत्तृत्वाच्या कार्याचा अभ्यास आपण करणार आहोत.

## रेड लाईट क्षेत्रातील शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने-

मानव हा समाजशील प्राणी आहे. त्यामुळे तो स्वतःला समाजात सामावून घेण्याचा प्रयत्न करतो. त्याला अपवाद रेड लाईट क्षेत्रातील मातांची मुलेही नाहीत. त्यांच्या आईच्या कामामुळे त्यांना स्वयंसेवी संस्थांकडे आसरा घ्यावा लागतो. कौटुंबिक व सामाजिक वातावरणाच्या अभावाचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो. इतर समाजातील मुलांपेक्षा त्यांच्या समस्या खूपच वेगळया असल्याने त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे मोठे आव्हान ठरते. स्वयंसेवी संस्थांमुळे त्यांना शाळेत दाखल केले जाते. पण त्यांची गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारी शालेय नेतृत्वावर असते. रेड लाईट क्षेत्रातील मातांच्या अपत्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणताना शालेय नेतृत्वापुढे अनेक आव्हाने आहेत. ती पुढीलप्रमाणे:-

### १) विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने:-

- रेड लाईट क्षेत्रातील बालकांना शाळेत दाखल करून घेऊन त्यांच्यामध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे. तसेच अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बालकांचा सक्रिय सहभाग घेऊन त्यांची गुणवत्ता वाढविणे हे आव्हान असते.
- या बालकांच्या भावविश्वात शिरून त्यांना बोलके करणे आणि भावभावनांचे समायोजन करून त्यांना आपलेसे करणे हे आव्हान असते.
- मानसशास्त्रीय विश्लेषणातून वर्तन विषयक समस्या सोडविण्यासाठी उपचारात्मक मार्गाचा अवलंब करणे हे शालेय नेतृत्त्वापुढे आव्हान असते.

**२) शिक्षकांशी संबंधित आव्हाने :-**

- रेड लाईट क्षेत्राबाबत भीती, तणाव व शाळेजवळील सामाजिक वातावरण यांमुळे शिक्षकांची या क्षेत्रात काम करण्याची मानसिकता दिसून येत नाही. त्यांना त्यांची भीती कमी करून, सामाजिक वातावरणाची योग्य ती ओळख करून देऊन ही बालके आपली आहेत ही भावना निर्माण करण्याचे मोठे आव्हान शालेय नेतृत्वासमोर असते.
- पालक भेटी व पालक सभा घेताना शिक्षकांच्या मनामध्ये या मातांबाबत असलेली घृणा, दडपण कमी करणे. हे आव्हान असते.
- शिक्षकांच्या मनात या बालकांप्रतींची आस्था वाढवून इतर बालकांबरोबरच या बालकांची गुणवत्ता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकांना वारंवार प्रेरित करणे हे शालेय नेतृत्वापुढे आव्हान असते.

**३) पालकांशी संबंधित आव्हाने :-**

- रेड लाईट क्षेत्रात बालकांचे पालक हे त्यांच्या माताच असतात. त्या मातांना त्यांच्या अपत्यांविषयी शैक्षणिक मार्गदर्शन व समुपदेशन करणे हे मोठे आव्हान असते.
- पालक भेटी व पालक सभेस वेळेत व नियमित उपस्थित ठेवणे. त्यांचे मत घेणे हेही मोठे आव्हान शालेय नेतृत्वासमोर असते.
- शाळेबाबत त्या मातांच्या मनात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, त्यांना आपले बालक सुरक्षित आहे असे वाटणे, शाळेविषयी आपुलकी निर्माण करणे, हे शालेय नेतृत्वासमोर आव्हान असते.

**४) समाजाशी संबंधित आव्हाने :-**

- मुंबई शहरातील कामाठीपुरा हा भाग रेड लाईट क्षेत्र म्हणून ओळखला जातो. या क्षेत्रात वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया येतात. या देहविक्री व्यवसायामुळे त्यांची समाजाकडे बघण्याची मानसिकता बदलेली असते. जीवन जगण्यासाठी हा व्यवसाय करणे हेच त्यांचे ध्येय ठरलेले असते. या व्यवसायामुळे त्या अनेक आजारांना बळी पडत आहेत.
- कौटुंबिक व सामाजिक वातावरणाच्या अभावामुळे त्या मुलांच्या शिक्षणापेक्षा त्यांच्या सुरक्षिततेबाबत जास्त सजग असतात. मातांच्या या व्यवसायामुळे त्या शाळेशी जोडल्या जात नाहीत. त्यामुळे लोकसहभाग मिळविणे, त्यांचे सहकार्य मिळविणे हे शालेय नेतृत्वापुढे एक आव्हान असते.

## <u>मुख्याध्यापक यशोगाथा-</u>

**मुख्याध्यापकाचे नाव:- श्री. भरत वन्या वसावे**

**शाळा:- बृहन्मुंबई (BMC) महानगरपालिका उच्च प्राथमिक हिन्दी, कामाठीपुरा शाळा**

श्री. भरत वन्या वसावे मूळचे नंदुरबार जिल्ह्यातील. जुलै २००९ मध्ये प्रथमच शिक्षक या पदावर ताडवाडी म.न.पा. उच्च प्राथमिक हिन्दी शाळा येथे रुजू झाले. त्यानंतर ऑगस्ट २०१४ मध्ये पदोन्नतीने मुख्याध्यापक पदावर रेड लाईट क्षेत्रातील कामाठीपुरा उच्च प्राथमिक (इ. १ ली ते ८ वी) हिन्दी शाळेवर नेमणूक झाली. ही शाळा मिळाली, पण रेड लाईट क्षेत्रामध्ये असल्यामुळे नाराजी, भीती असा भावनांचा कल्लोळ झाला. या भागामध्ये रुजू होण्यास कोणीही तयार नसतं. रेड लाईट क्षेत्रातील एकंदरीत ऐकीव माहिती, सामाजिक परिस्थिती, वातावरण पाहता कोणी तिकडे रुजू होत नव्हते. कुटुंबावर काही विपरीत परिणाम तर होणार नाहीत, मित्र, नातेवाईक यांचा माझ्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणार तर नाही, असे

विचार त्यांच्या मनात येत असत. परंतु खूप विचाराअंती त्यांच्या मनाने निर्णय घेतला. अशी संधी सर्वांनाच मिळत नाही. नक्कीच आपण काहीतरी वेगळं करू शकतो हे जाणून त्यांनी ठरवलं की, या संधीचं सोनं करायचं.

प्रत्यक्ष शाळेवर जायचा दिवस उजाडला. दि. १६ ऑगस्ट २०१४ रोजी १२.३० वाजता भायखळा स्टेशनवर सर पोहोचले. बाहेर आल्यावर विचारत विचारत शाळेवर पोहोचले. मनात जी भीती होती, तसं काही चित्र दिसलं नाही. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ आल्यावर वाटलचं नाही की, ते कामाठीपुरा भागात आहेत. शाळेची सुसज्ज अशी चारमजली इमारत होती. संपूर्ण दिवस शाळा, शिक्षकवृंद, मुले यांना जाणून घेण्याचा प्रयत्न करत होते. एक मात्र त्यांना जाणवलं की, शाळा ही शाळाचं असते. वातावरणाचा फारसा फरक शाळेअंतर्गत भागात पडत नाही. शाळेत येण्यापूर्वी त्यांना जी भीती होती, ती दूर झाली होती. संध्याकाळी ६ वाजता शाळा सुटली आणि ते त्या वस्तीतून स्टेशनवर जायला निघाले. विचित्र नजरा, इशारे चुकवीत खाली मान घालून पण, तिरक्या नजरेने ते सगळे टिपत होते. तितक्यातच कुणीतरी त्यांचा हात पकडला आणि ते भानावर आले. सोडा, असं उसनं अवसान आणून बोलले. ती व्यक्ती पण, तितक्याच दमाने "इधर क्या है, क्यो आया है? चल मेरे साथ", असं म्हणायला लागली. त्यांनी त्यांचे आयडी दाखविले आणि इथल्या शाळेतील मुख्याध्यापक आहे, असे म्हटल्यावर त्यांची सुटका झाली. इतक्या बेदरकारपणे बोलणारी ती व्यक्ती नम्र झाली, 'माफ करा साहेब,' म्हणत निघून गेली. (तो त्या देहविक्री करणाऱ्या स्त्रियांचा माणूस असतो. त्याला 'आदमी' म्हणतात असे स्वयंसेवी संस्थेकडून समजले.) अशा प्रकारांना जवळ जवळ १५ दिवस ते सामोरे गेले. हळूहळू त्यांना तेथील लोक ओळखू लागले आणि हा त्रास कमी झाला. सरांच्या बोलण्या-चालण्यात आत्मविश्वास आला आणि त्यांनी कामाला सुरवात केली.

मुलं तर शाळेत येत होती, पण त्यांचं नुसतच येणं, उपस्थिती सरांच्या दृष्टीने महत्त्वाचे नव्हते . मुलांचा सर्वांगीण विकास करायचा होता म्हणून प्रत्येक वर्गात, प्रत्येक मुलाशी भावनिकदृष्ट्या ते जोडले गेले. त्यांनी शिक्षक सहविचार सभा घेतल्या. या क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या, कामाठीपुरा मधील स्वयंसेवी संस्थांच्या भेटी घेतल्या. त्याचं कार्य जाणून घेतलं, सहकार्य घेतलं आणि गुणवत्ता वाढीसह विद्यार्थ्यांचा सर्वांगीण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. हे प्रयत्न करीत असताना अनेक समस्या 'आ' वासून समोर उभ्या होत्या. मात्र जिथे समस्या असतात, तिथे मार्गही अनेक असतात. त्यांनी सुरूवात केली ती, दाखलपात्र विद्यार्थ्यांपासून. या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने मुलांच्या गृहभेटी केल्या. त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. पटनोंदणी पंधरवडा अंतर्गत प्रत्येक मूल शाळेत येण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आणि प्रयत्नांना यश आले. सर्वेक्षण व गृहभेटींमुळे शाळेचा पट वाढू लागला. त्यांचा उत्साहही वाढू लागला. सध्या शाळेचा पट १५७ असून त्यापैकी ३०% विद्यार्थी हे त्या मातांची अपत्ये असून त्यामध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे.




**तांदूळ वाटप करताना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक**

मुलांना शाळेत दाखल करताना मुलांच्या नावात वैविध्य दिसून आले. जसे मुलांच्या नावापुढे वडिलांऐवजी आईचे नाव, मुलाचे प्रथम नाव वेगळया धर्माचे, तर आडनाव वेगळया धर्माचे!, नावामध्ये धार्मिक सहसंबध दिसत नव्हता. शिवाय दाखल झाल्यावर वारंवार नाव बदलण्याबाबत या माता अक्षरशः वाद घालत होत्या आणि हे सरांसाठी फार जिकिरीचं होतं. मग पुन्हा त्यांच्या खऱ्या पालकांचा संदर्भ घेत, पालकांचे समाधान होईपर्यंत ते पुन्हा पुन्हा बदल करत होते. हे करत असताना मुलांना काय म्हणायचं आहे हेही कळायचे नाही. कारण भाषेचा अडसर. बहुतांशी माता या पश्चिम बंगाल परिसरातून आल्या होत्या. त्यांची मातृभाषा बंगाली, शाळेचे माध्यम हिन्दी, मग पर्याय म्हणून त्यांनी एका बंगाली शिक्षकाकडून प्राथमिक बंगाली शिकून घेतली. मुलांच्या हावभावातून त्यांना काय म्हणायचं आहे, ते समजू लागले. कालांतराने सर थोडेसे बंगाली आणि मुले छान हिन्दी बोलू लागली. भाषेचा अडसर कसाबसा दूर झाला, पण मुलांच्या वर्तन समस्या डोकं वर काढत होत्या. इतर मुलांपेक्षा ही मुलं जास्त दांडगट, निर्भिड, शिवराळ होती. कारण स्पष्टच होतं, ती ज्या वातावरणातून, परिसरातून आली होती तिकडे संस्काराचा लवलेशही नसतो. मग त्यांनी या मुलांसाठीच नाही, तर सर्वांसाठी सहशालेय उपक्रमांमधून मूल्ये रूजवणुकीसाठीचे विविध उपक्रम राबविले. प्रसंगी काही समुपदेशक, बालमानसशास्त्रज्ञ यांची मदत घेतली आणि यश मिळवलं. या मुलांना समाजाशी एकरूप होण्यासाठी शाळा, समाज, पालक, विद्यार्थी यांच्यात सुयोग्य आंतरक्रिया घडून येण्यासाठी, इतर विद्यार्थी व हे विद्यार्थी यांच्यामध्ये कोणताही फरक त्यांच्या स्तरावरून होणार नाही याची दक्षता घेतली. पालकांमध्येही असा कोणताच भेद केला नाही. सर्व विद्यार्थी, पालक शाळास्तरावर समांतर होते. उदा. शाळा व्यवस्थापन समितीमध्ये उपाध्यक्ष आणि सदस्य म्हणून या माता सक्रिय सहभागी आहेत. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून या मातांच्या मुलांचा समावेश केलेला आहे. शिवाय माता पालक संघ, पोक्सो कायदा समिती अशा शालेय स्तरावरील विविध समित्यांमध्ये त्या माता महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. या मातांची मुले व इतर मुले यांच्यातील भेदभाव दूर करण्यासाठी सर्व मुलांना समान वागणूक दिली जाते. सर्व कार्यक्रमांमध्ये सर्वांचा सक्रिय सहभाग घेतला जातो. यामुळे इतर मुलांच्या वागणुकीमध्ये ती मुले वेगळी असल्याची भावना जाणवत नाही.

अनेक समस्या गुणवत्ता वाढीमध्ये अडसर निर्माण करत होत्या. सर समस्येचे निराकरण करत गेले, यश येत गेलं, पण त्यांना इथेच थांबायचं नव्हतं. १००% मुले शिक्षणाच्या प्रवाहात नुसती आणायची नव्हती, तर शिकवायची होती, टिकवायची होती आणि गुणवत्ता वाढवायची होती. त्यासाठी त्यांनी शासनाच्या प्रत्येक उपक्रमात सहभाग नोंदविलाचं. शिवाय शालेय स्तरावर अनेक आनंददायी उपक्रम राबविले.

- **२७ वस्तूंचे वाटप:-** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये मुलांची उपस्थिती व गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रत्येक बालकास २७ प्रकारच्या वस्तू दिल्या जातात. यामध्ये शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तूंचा समावेश केलेला आहे. तसेच मुलींना Sanitary Napkin ही दिली जातात.
- **शालेय पोषण आहार:-** मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी आणि कुपोषण दूर होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला दररोज शालेय पोषण आहार दिला जातो.
- **व्हर्चुअल क्लासरूम:-** प्रत्येक महानगरपालिका शाळेमध्ये व्हर्चुअल क्लासरूम आहेत. मुलांसाठी विविध तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन या व्हर्चुअल क्लासरूमद्वारे आयोजित केले जाते.
- **संगणक प्रयोगशाळा:-** या शाळेमध्ये संगणक प्रयोगशाळा असून त्यामध्ये ११ संगणक आहेत. शिक्षक मुलांना संगणकाचा वापर करून एम.एस.ऑफिस, इंटरनेट, पेंट इ. विषयी प्रात्यक्षिकासह माहिती देतात. विद्यार्थ्यांना दिलेल्या वेळापत्रकानुसार विद्यार्थी प्रयोगशाळेत येऊन एम.एस.ऑफिस, इंटरनेट, पेंट इ. चा वापर करतात.
- **डिजिटल क्लासरूम:-** शिक्षक त्यांचे अध्ययन-अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी डिजिटल क्लासरूमचा वापर करतात.

- **सण व उत्सव:-** या मुलांमध्ये मूल्यांची रुजवणूक होण्यासाठी सण व उत्सव शाळेत साजरे केले जातात.
- **सहशालेय उपक्रम:-** शाळेमध्ये निबंध स्पर्धा, नाट्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा अशा विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यात या मुलांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न होतात.
- **क्रीडा स्पर्धा:-** मुलांचा शारीरिक विकास होण्यासाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते. या मातांच्या मुलांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित केले जाते.
- शाळा व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघ व माता पालक संघ यांच्या नियमित सभा घेतल्या जातात. या सभेत या मातांचा सक्रिय सहभाग घेतला जातो.

अशाप्रकारे विविध गुणवत्तापूर्ण उपक्रम राबविल्यामुळे शाळेची शैक्षणिक प्रगती वाढली आहे. शाळेची पटसंख्या व मुलांची उपस्थिती वाढलेली असून मुलांचा अध्ययनस्तर उंचावला आहे. शाळेतील ०२ मुले शिष्यवृत्ती परीक्षा पास झालेली आहेत. तसेच विविध शालेय व सहशालेय उपक्रमांमध्ये मुलांना पारितोषिके मिळाली आहेत.

श्री. भरत वसावे सरांनी रेड लाईट क्षेत्रातील मातांच्या मुलांसाठी केलेले शैक्षणिक, सामाजिक कार्य हे तिथल्या परिसरासाठीच नव्हे, तर सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे.

## <u>चिंतनात्मक प्रश्न</u>-

१) श्री. भरत वसावे सरांच्या यशोगाथेबद्दल तुमचे मत/ अभिप्राय लिहा.
२) रेड लाईट क्षेत्रात काम करीत असताना वसावे सरांसमोर असलेल्या आव्हानांची यादी करा.
३) रेड लाईट क्षेत्रातील शाळांमध्ये काम करण्यासाठी कोणत्या नेतृत्व कौशल्यांची गरज आहे असे आपणास वाटते.

## <u>विचार करूया, चर्चा करूया</u>-

१) मुंबई शहराच्या रेड लाईट क्षेत्रातील कामाठीपुरा भागातील एका बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) शाळेचे तुम्ही मुख्याध्यापक आहात. शाळेच्या पटसंख्येपैकी ५०% विद्यार्थी त्या मातांची अपत्ये आहेत. त्या बालकांच्या सुरक्षिततेबाबतच्या प्रश्नांमुळे त्या माता त्यांच्या मुलांना शाळेत पाठविण्यास तयार नाहीत. अशा परिस्थितीत तुम्ही काय कराल?
२) रेड लाईट क्षेत्रातील एका शाळेत ज्या शाळेच्या पटसंख्येपैकी ९०% विद्यार्थी हे त्या मातांची अपत्ये आहेत आणि तीनिय्मित शाळेत येत नाहीत,गैरहजेरीचे प्रमाण प्रचंड आहे अशा शाळेत तुमची मुख्याध्यापक म्हणून बदली झाली आहे. या क्षेत्राबाबत तुम्हाला फक्त माहिती आहे, पण काम करण्याचा अनुभव नाही. मुलांनी दररोज शाळेत यावे यासाठी तुमची कृती योजना मुद्देनिहाय लिहा .

## <u>शाळा विकास आराखडा नियोजन</u>-

आपण कार्यरत असलेल्या शाळेची सद्य:स्थिती लक्षात घेऊन शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एक वर्षाचा शाळा विकास आराखडा तयार करा.

## <u>रेड लाईट क्षेत्रात काम करताना असेही करता येईल</u>-

१) रेड लाईट क्षेत्रात यशस्वीरीत्या काम करण्यासाठी या मातांच्या भेटी घेणे. त्यांना विविध समित्यांमध्ये अध्यक्ष / सदस्य म्हणून नियुक्त करणे.

२) या मातांचा सहभाग वाढविण्यासाठी शाळेतील विविध कार्यक्रमांत व उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग घेणे. उदा. पालक उद्बोधन, महिला मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम इ.

३) शाळेत गुणवत्तापूर्ण उपक्रमांचे आयोजन करून त्यात बालकांचा सहभाग वाढविणे. उदा. दोस्ती आनंद मेळावा, स्टोरी टेलिंग, प्रश्नमंजूषा, करिअर शो, पपेट शो, आनंददायी शिक्षण इ.

४) वेळोवेळी या बालकांना मार्गदर्शन व समुपदेशन करून वर्तन बदल करणे.

५) या क्षेत्रातील मातांसाठी उद्बोधन शिबिरांचे आयोजन करून त्यांना बोलण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

६) त्यांच्या मातृभाषेसह त्यांना मराठी व हिंदी भाषेकडे वळविणे.

७) विद्यार्थी दाखल करण्यासाठी गरजेनुसार स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे.

८) माता व बालकांसाठी एकत्रित शिक्षणोत्सव व बालोत्सव सारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

९) शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, स्वयंसेवी संस्था, पालक, शिक्षक यांच्यात समन्वय ठेवणे.

१०) विद्यार्थ्यांसाठी सहशालेय उपक्रम उदा. वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजूषा, क्रीडास्पर्धा, आयोजित करून ही बालके व इतर बालके यांच्यातील दुरी कमी करणे.

**<u>रेड लाईट क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विशेष योजना</u>-**

१) बाल संगोपन संस्था

२) बाल सल्ला केंद्र

३) बाल संगोपन योजना

**<u>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने रेड लाईट क्षेत्रातील शिक्षणाच्या संदर्भाने केलेले विचार</u>-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात रेड लाईट क्षेत्रातील शिक्षणाच्या संदर्भात स्पष्ट विचार मांडलेले नसले, तरी या क्षेत्राबाबतचा विचार भाग-१, शालेय शिक्षणामधील प्रकरण-६, समन्यायी व समावेशित अंतर्गत केलेला आहे.

**<u>समन्यायी आणि समावेशित शिक्षण: सर्वांसाठी शिक्षण</u>-**

- जन्म परिस्थिती किंवा पार्श्वभूमी यांमुळे कुठलेही मूल शिक्षणाची आणि प्रगती करण्याची संधी गमावणार नाही. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटावर विशेष भर देत सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण समान संधी उपलब्ध करून दिली जाईल.
- शालेय शिक्षणातील सर्व स्तरावर लिंग व सामाजिक संवर्गाची दरी भरून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही याबाबतीत माध्यमिक स्तरावर असमानता दिसून येते. सर्व अल्पसंख्यांक समुदाय आणि विशेषतः शैक्षणिकदृष्ट्या अल्प प्रतिनिधित्व असणारे समुदाय यांच्या मुलांच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यात येईल असे धोरणात म्हटले आहे. याशिवाय, विद्यार्थी शिष्यवृत्ती, मुलांना शाळेत पाठविण्यासाठी आई-वडिलांना सशर्त अनुदान / रक्कम, शाळेत येण्याजाण्यासाठी सायकल देणे अशा महत्त्वपूर्ण योजना सुरू करण्यात आल्या आहेत. यामुळे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटाची

(SEDGs) भागीदारी शालेय शिक्षणाच्या काही विशिष्ट भागात वाढली आहे. त्यामुळे या योजना संपूर्ण देशात राबविण्याबाबत विचार केला जाणार आहे.

- काही भौगोलिक क्षेत्रामध्ये प्रामुख्याने सामाजिक आणि आर्थिकदृष्टया वंचित गट (SEDGs) हा मोठयाप्रमाणात असल्याचे आकडेवारीवरून दिसते. अशा ठिकाणी शैक्षणिक विकासास प्रोत्साहन देण्यासाठी खास उपक्रमाची आवश्यकता आहे. असे NEP मध्ये नमूद केले आहे.
- सामाजिक आणि आर्थिकदृष्टया वंचित गटा (SEDGs) पर्यंत शिक्षण पोहोचण्यातील, अडचणी दूर करण्यासाठी निधीची व्यवस्था केली जाईल. या धोरणाचा उद्देश कोणत्याही लिंग किंवा इतर सामाजिक, आर्थिकदृष्टया वंचित गटातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण देण्यातील विषमता दूर करणे हा आहे.

**<u>रेड लाईट क्षेत्रातील मोडयुलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता</u>-**

रेड लाईट क्षेत्रातील मातांच्या अपत्यांच्या शिक्षणाबाबत अद्याप हवा तसा विचार झालेला नाही. महाराष्ट्रात अशी अनेक रेड लाईट क्षेत्रे आहेत, जिथे अशा प्रकारची मुले शिक्षण घेत आहेत. त्या मुलांना समतापूर्वक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. या मोडयुलचा उपयोग महाराष्ट्रात नव्हे तर भारतातील अशा क्षेत्रात कार्यरत नेतृत्वाला निश्चितच होणार आहे.

- बालकाचा मोफत व सक्तीचा हक्क अधिनियम २००९ ची प्रभावी अंमलबजावणी
- रेड लाईट क्षेत्रासंबंधीत येणाऱ्या समस्यांचे विश्लेषण व त्यावर उपाययोजना
- रेड लाईट क्षेत्रातील मुलांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होईल.
- रेड लाईट क्षेत्रातील मुलांना शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होईल.
- रेड लाईट क्षेत्रातील मुलांना समाजामध्ये मान सन्मान मिळविण्याची संधी उपलब्ध होईल.

**<u>समारोप</u>-**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे, मग तो विद्यार्थी कोणत्याही सामाजिक व वंचित पार्श्वभूमीचा का असेना. तशाच प्रकारे रेड लाईट क्षेत्रात काम करणे तसे सोपे नाही, पण नेतृत्वाने ठरविले तर निश्चितच हे ध्येय पूर्ण करू शकतो. NEP 2020 च्या प्रस्तावनेत सांगितल्या प्रमाणे सर्वच सामाजिक क्षेत्रातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. तशाच प्रकारे रेड लाईट क्षेत्रातील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. त्यानुसारच श्री. भरत वसावे सरांसारखे, समतेची जाणीव ठेवून शाळेतील सर्वच मुलांसाठी झटणारे अनेक मुख्याध्यापक आपल्या राज्यात कार्यरत आहेत. अशा सर्व मुख्याध्यापकांनी ठरविले तर यश निश्चितच मिळेल.

**<u>संदर्भसूची</u>-**


१) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

२) नागपुरातील वेश्या व्यवसाय करणाऱ्या वेश्या स्त्रियांचा आपल्या अपत्यांविषयीचा दृष्टिकोन- डॉ. राणी खेडीकर (नागपूर विद्यापीठ, PhD प्रबंध)

३) बालकांचे हक्क व सुरक्षितता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे

४) संघर्ष क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका- डॉ.किरण धांडे, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

**Website-**

1) https://mr.vikaspedia.in/social-welfare
2) https://sameerbapu.blogspot.com//2018/12/blog-post.html
3) https://preranaantitrafficking.org/
4) https://www.loksatta.com/chaturang.news/chaitanya-mahila-Mandal-207509/
5) https://wikipediaorg/wiki/kamathipura
6) https://womanchild.maharashtra.gov.in



**मोड्यूल विकसक**
डॉ.प्रभा बाळकृष्ण खरटमोल,
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
ठाणे.

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

**मार्गदर्शक**
डॉ.नेहा बेलसरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद